

# साक्षरतेच्या कथा

— साने गुरुजी

साधना प्रकाशन, मुंबई ११

साधना प्रकाशन ४.

# साक्षरतेच्या कथा

लेखक

सानेगुरुजी

साधना प्रकाशन, आर्थर रोड, मुंबई ११

किंमत ~~सहा आणे~~
४० नये पैसे

# दोन शब्द

'साक्षरतेच्या कथा' या पुस्तकाची पहिली आवृत्ति संपल्यामुळें ही द्वितीयावृत्ति काढून वाचकांना देण्यात येत आहे. हें पुस्तक बृहन्महाराष्ट्रांत जेथें जेथें साक्षरतेचे वर्ग, प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालू आहेत तेथें तेथें गेलें आहे. कोणी कोणी त्यांतील गोष्टींवर नाट्यप्रवेशहि बसविले आहेत. या गोष्टी रोजच्या जीवनांतील आहेत, प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत. लिहावाचायला शिकणें किती आवश्यक आहे तें या सत्यकथांवरून सर्वांना सहज पटेल. लोकसत्ताक भारतांत स्त्री वा पुरुष कोणीहि निरक्षर राहतां कामा नये. साक्षर व्हायची प्रेरणा हें चिमुकलें पुस्तक देत आहे म्हणून मला आनंद वाटणें साहजिक आहे.

—साने गुरुजी

★

द्वितीय आवृत्ति : जून १९५० : सर्व हक्क सुरक्षित

मुद्रक–प्रकाशक : श्रीरंग वरेरकर

साधना प्रेस–साधना प्रकाशन, आर्थर रोड, मुंबई ११.

# साक्षरतेच्या कथा

★ ★ ★ : : **कथा पहिली**

ती पहा अंधारी खोली. कोण राहतें त्या खोलींत? कोण राहणार? गरीबाशिवाय कोण राहणार? रमी रहाते तेथें. तिचा एक मुलगा तिकडे मुंबईला गिरणींत काम करतो. तो रमीला पैसे पाठवतो. परंतु त्या पांचदहा रुपयांवर थोडाच संसार चालणार? घरांत आणखी चार मुलें आहेत. नवरा मरून दोन वर्षें झालीं. रमीवर सारा भार. वडील मुलगा मुंबईला गेला. फार मोठा का होता तो? मोठा कुठला? सतरा अठरा वर्षांचा असेल. परंतु आईला म्हणाला " जातों मी. तेवढेंच एक तोंड पोसायला कमी होईल. या भावंडांना कांहीं पाठवीन. " आणि तो खरंच पाठवी.

रमी मजूरी करी. शेतांत जाई. खान्देशांतील तो उन्हाळा. परंतु गरीबाला ना उन्हाळा ना हिंवाळा. थंडींत त्यानें कुडकुडावें, उन्हांत त्यानें करपावें. रमीची दहाबारा वर्षांची मुलगी ती सुद्धां कामाला जात असे. गरीबाच्या मुलांना लौकर मिळवतं व्हावं लागतें.

घरीं मुलांना भाकरतुकडा करून ठेवून रमी कामाला जायची. ती असे कामांत परंतु लक्ष पोरांकडे असायचें. एके दिवशीं कामावरून आली तों तिची मोठी मुलगी तापानं फणफणलेली. फाटकी घोंगडी पांघरून पडून होती.

" बाबी काय ग होतं ? " रमीनें विचारलें.

" ताप भरला आई. कामावरून कशीतरी घरीं आलें. बस माझ्याजवळ. " आठ दिवस झाले. बाबीचा ताप हटेना. रमीला कामाला जातां येईना. घरांत वीष खायलाहि दिडकी नाहीं. तिकडे वडील मुलाची नोकरीहि सुटली होती. कोठून पाठवणार तो पैसे ? कसें दवापाणी करावें, कोठून मोसंबें आणावें ? गरीबांची दैना आहे.

त्या भागाला पैलाड म्हणत. सारी गरीबांची वस्ती. सकाळीं सातानंतर कोणी घरांत नाहीं सांपडायचें. लहान मुलें, कुत्रीं, हीं असायचीं गांवांत. बाकी गेलीं सारीं कामाला.

आज दुपारच्या वेळेला एकदम टपालवाला आला. " रमी कोण आहे रमी " म्हणत आला. रमी मुलीच्या डोक्यावर हात ठेवून बसली होती. डोळ्यांतून पाणी घळघळत होतें.

" मी रमी भाऊ " ती म्हणाली.

" किती शोधायचें. नीट पत्ता नाहीं. मनी आर्डर आहे. पैसे आले आहेत. "

" पोरानं पाठवले होय ना ? "

" पोरानं का चोरानं मला नाहीं माहीत. "

" तो पूर्वीचा टपालवाला मला ओळखी. तुम्ही नवीन आलांत वाटतं ? "

" तो गेला बदलून. सही करा. "

" मी कोठून सही करणार ? आम्हांला का लिहितां येतं दादा ? "

" आंगठा द्या. येथें कोणाची तरी साक्ष हवी. कोणाला बोलवा. " रमीनें शेजारीं इकडे तिकडे पाहिलें. कोणी चिट-पांखरूं नाहीं.

" दादा, सारे कामाला गेलेले. कोणाला आणूं ? द्या पैसे. माझेच आहेत. पोर तापानें फणफणली आहे. मोठ्या डाक्टराला आणीन. त्याला देईन हे पैसे. "

" साक्षीशिवाय कसे देऊं ? मी चाललों. "

" उद्यां आणाल का भाऊ ? "

" या खेड्यांत दोनदां येतें टपाल आठवड्यांतून. उद्यां कसा मी येणार ? आतां चार दिशीं. जातों मी. मला का तुझेंच एकटीचें घर आहे म्हाताऱ्ये ? "

तो टपालवाला निघून गेला. त्याला आणखी गांवें घ्यायचीं असतील. रमी रडूं लागली. पोरानें पोटाला चिमटे घेऊन पैसे

पाठवले. परंतु मिळत नाहींत. आपले असून मिळत नाहींत. म्हणे सही कर. आम्हांला का लिहावाचायला येतं? असें मनांत म्हणत ती पोरीजवळ जाऊन बसली.

तिसरा प्रहर झाला. तो कोण आला मुलगा? त्याच्या भोंवतीं ती पहा लहान मुलांची गर्दी. कोणाला चित्रें देत आहे, कोणाला खाटीमिठी लिमलेटची वडी. तो एकाला म्हणाला :

"अरे तुझ्या हातांना ही खरूज आहे. थांब हें मलम चोळतों. रोज हात धुवून तें लावीत जा."

"माझे डोळे बघतां का?"

"बघूं? लाल झाले आहेत. पुढच्या वेळेस औषध आणीन हां."

"त्या रमीकडे येतां? तिची मुलगी बाबी फार आजारी आहे."

"दाखवा घर."

रमेश रमीच्या घरीं आला. मुलीजवळ माय बसली होती.

"आई, हा गांधी आला आहे बघ."

"कोणरे बाबा तूं?"

"मी सेवादलांतला मुलगा. आम्हीं खेड्यांतून पाळीपाळीनें औषधें वगैरे घेऊन हिंडायचें ठरवलें आहे. काय होतें मुलीला?"

"ताप, भारी ताप. आणि डाक्टर कोठून आणूं? आज पोराचे पैसे आले होते. म्हटलं कीं डाक्टर आणीन सोनगांवचा. परंतु पैसे मिळाले नाहींत."

नगर वाचनालय सातारा



" कां नाहीं मिळाले ? "

" सही करतां येत नाहीं. साक्षीला माणूस भेटेना. गांवांत शाळा नाहीं. मास्तराची साक्ष घेतली असती. तो मागचा टपालवाला मला ओळखी. कोणाची तरी साक्ष घेई. हा नवा माणूस. पैसे येऊनहि मिळाले नाहींत. "

" आई, मी डॉक्टर घेऊन येईन. बरी होईल मुलगी. परंतु तुम्ही सर्वांनीं शिकलें पाहिजे. "

" कधीं शिकायचं दादा ? "

" रात्रीं घटकाभर. मी येथें रात्रीची शाळा काढीन. तुम्ही याल ? "

" मी येईन, माझीं पोरें येतील. आम्ही सारीं शिकूं. माझ्या पोराला मी मग कागद लिहीन. तोबी मुंबईला शिकतो आहे. पैसे येऊन मिळाले नाहींत. शिक्षण नाहीं म्हणजे सारें फुकट. "

रमेश दुसऱ्या दिवशीं डॉक्टरला घेऊन आला. औषध मिळूं लागलें. बाबी बरी झाली. रमेश त्या गांवींच येऊन राहिला. लहानसा गांव. त्यानें तेथें शाळा काढली. सायंकाळीं मुलांना शिकवी. रात्रीं मोठ्यांना. एके दिवशीं पुरुष मंडळी येई. एके दिवशीं आयाबाया. बाबी आणि तिची आई सगळ्या बायकांना बोलवायच्या. गांवांत सेवादल आलें. स्वच्छता आली. साक्षरता आली. छोटे उद्योग येऊं लागले. रमेशला सारे दुवा देत.

सेवादलाला दुवा देत. परंतू रमेश म्हणायचा "बाबीच्या आईला सारें श्रेय. ती म्हातारी शिकायला उभी राहिली. तिच्यामुळें गांव तयार झाला. शिकल्यावांचून गति नाहीं म्हातारीला पटलें. ज्ञान म्हणजे भगवान. लिहिणें वाचणें हवें. नाहींतर पदोपदीं अडतें. लिहितां वाचतां येणें म्हणजे आजकाल मोठा आधार असतो." असें म्हणून रमेश गाणें गाऊं लागे व मुलेंहि म्हणूं लागत.

शिकूं शिकूं
शिकूं शिकूं
स्पर्धेमाजी आम्हि टिकूं ।।

जो न शिके
जो न शिके
आनंदा तो मूर्ख मुके ।।

शिका शिका
शिका शिका
संसारीं मिळवाल सुखा ।।

गाणीं गात मुलें नाचूं लागत. मोठी गंमत होई.

• • •

★ ★ ★ : : कथा दुसरी

त्या गांवच्या माळणी भाजीपाला घेऊन जेथें जेथें आठवड्याचा बाजार भरे तेथें तेथें जायच्या. मोठ्या उद्योगी नी मेहनती. जड टोपल्या घेऊन त्या चारचार कोस जायच्या. दिवे लागायला घरीं परत यायच्या. मग चूल पेटवून भाकरी तुकडा करीत. मुलांना जरा जवळ घेत.

पाचोऱ्याचा आठवडे बाजार म्हणजे यात्राच असे. जिकडे-तिकडे दुकानेंच दुकानें. एका बाजूला आपापल्या पाट्या घेऊन माळणी बसायच्या. आज त्या माळणींच्या रांगेत एक माळी-दादाहि भाजी घेऊन बसला होता. माळणी कुजबुजत होत्या. परंतु आतां बोलायला सवड नाहीं. गिऱ्हाइकांची ही पहा गर्दी. भाजी खपत आहे. पैसे जमत आहेत. वांगीं, रताळीं, घेवडा, गवार, कोबी, फुलवर, मेथी, चुका, नाना प्रकार तेथें आहेत. कोथिंबिरीचा घमघमाट सुटला आहे.

इतक्यांत तो पहा एक मोठी पिशवी घेऊन आलेला मनुष्य भराभर हवी ती भाजी उचलीत आहे. चार वांगीं घे, चार रताळीं घे, कोथिंबिरीची जुडी उचल, लिंबें उचल, असें त्यानें चालवलें आहे. कोण आहे तो ? माळणी त्याला घे बाबा नी जा असें म्हणत. काय करतील बिचाऱ्या ! त्या माणसाचा काय हक्क त्या भाजीवर ? जणूं त्याची ती कायमची वतनदारीच दिसत होती. त्या माळणी जणूं त्याच्या साताजन्मींच्या देणेकरी.

तो मनुष्य त्या माळीदादाजवळ आला. त्याच्याजवळ कोवळे लुसलुशीत मुळे होते. त्या माणसाच्या तोंडाला पाणी सुटलें. त्यानें एक जुडी उचलली.

" खालीं ठेवा ती जुडी. फुकट घ्यायचा काय अधिकार ? घेऊं नका जुडी. ठेवा खालीं " माळीदादा म्हणाला. माळणी बघत होत्या. त्यांना आश्चर्य वाटलें. आतां काय होतें म्हणून त्या बघत होत्या. त्या बायांदेखत झालेला हा अपमान त्या माणसाला सहन नाहीं झाला. आजपर्यंत कोणी त्याला असें बोललें नव्हतें. तो ऐटीनें म्हणालाः

" खालीं ठेव म्हणतोस, ही दुसरी घेतों बघ. तूं मला कोण समजतोस ? "

" तुम्ही पोलिसदादा आहांत. "

" याद राख. "

" याद तुम्हीच राखा. आतां काँग्रेसचें राज्य आहे. असें गोरगरिबांना सतावणें बरें का ? "

" तुझें व्याख्यान नको मला. "

" कुंपणच शेत खायला लागलें तर दादा शेतानें कोणाकडे जायचें ? तुम्ही प्रजेला सांभाळायचें तर तुम्हीच लुटायला लागलांत. इतके दिवस चालली मिरास. आतां नाहीं चालायची भाऊ. काळाप्रमाणें वागा. हा नवा जमाना आला. "

" गप्प बस. आला शिकवायला. "

त्या माळीदादानें खिशांतून डायरी काढली. त्या डायरीला लहानशी पेन्सिल बांधलेली होती. पोलीस बघत होता. माळणींचे इकडेच डोळे होते. इतर लोकहि थबकले. सर्वांना आश्चर्य वाटत होतें. माळीदादा पोलीसदादाला म्हणाला:

" तुमचें नांव सांगा. मला टिपून घ्यायचें आहे. मी वरतीं उद्यां अर्ज टाकतों. प्रेमानें मागून घेतलीत थोडी भाजी तर निराळी गोष्ट. महागाई असते. तुम्हांला पगार कमी असेल. परंतु अशी अरेरावी ! हें नाहीं चालायचें. नांव सांगा. "

पोलीस जरा घाबरला. त्यानें मुळ्याच्या जुड्या खालीं ठेवल्या. त्यानें माळणींची भाजीहि तेथेंच टाकली.

" जातों दादा. धडा शिकवलास. स्वराज्याचा अर्थ शिकवलास. अर्ज नको करूं. नांव कळवूं नको. पुन्हां मी येणार नाहीं " पोलीस नम्रपणें म्हणाला.

" रागवूं नका पोलीस दादा. आपण सारे भाऊ. न्या ही जुडी, खरेंच न्या. परंतु अशी कोणाची भाजी उचलूं नका " माळीदादा सौजन्यानें म्हणाला. त्यानें त्याला मुळे घेऊन जायला प्रेमानें भाग पाडलें. पोलीस गेला. बाजार चालू होता. सायंकाळ झाली. माळणी गेल्या. माळीदादा गेला.

आठवड्याच्या बाजाराला तो माळीदादा नेहमीं यायचा. परंतु आतां पोलीस कधीं फुकट भाजी उचलायला आले

नाहींत. त्या माळणींना नवल वाटे. एकदां माळणींनीं माळीदादाला विचारलें :

"का रे भाऊ, आतां भाजी उचलायला ते येत नाहींत. तूं काय मंत्र म्हटलास ? कोणती जादू केलीस ?"

"माझ्याजवळ एकच मंत्र होता."

"कोणता मंत्र ?"

"नांव टिपून घेतों म्हटल्याबरोबर अशीं माणसें भितात. आतां स्वराज्य आहे. त्रास कोणी देईल तर वरतीं लिहून कळवावें. ज्ञानाचा मंत्र. तुम्हां बायांना लिहितां वाचतां येत नाहीं. शिका आतां."

"आम्ही का शिकायचें ?"

"तुम्ही का माणसें नाहीं आहांत ? प्रत्येक माणसानें शिकायला हवें. स्त्रिया स्वराज्याच्या लढ्यांत तुरुंगांत सुद्धां गेल्या. त्या का मागें राहिल्या ?"

"खरें आहे रे भाऊ. त्या जळगांवची अनसूया, तिनें झेंडा लावला चावडीवर. आम्ही शिकूं पण कोण शिकवणार ?"

"सेवादलाचीं मुलें शिकवतील. सेवादलांतील मुली शिकवतील. आमच्या गांवची जमनी वर्ग घेते. तिला मी सांगेन. तुम्ही शिकाल ?"

"शिकूं, आम्ही शिकूं."

"छान. आपण जर शिकूं तरच स्वराज्य टिकेल, नि सगळ्यांच्या सुखाचें तें होईल. शिकल्यानें भीति जाते, सारें समजूं लागतें. ज्ञान म्हणजे भगवान."

"किती चांगलें बोलतोस तूं दादा."

"जमनी येईल हां तुमच्या गांवाला. तुमचें गांव कोणतें?"

"आम्ही विल्दीच्या."

आणि खरेंच सेवादलाची जमनी विल्दीस जाऊं लागली. मायबहिणी शिकूं लागल्या. त्या सभेंत बोलत. व्याख्यानांची त्या टिपणें ठेवीत. विल्दी गांवांत कोणी निरक्षर रहायचें नाहीं असें गांवकऱ्यांनीं ठरवलें आहे. त्यांचा संकल्प पुरा होवो.

• • •

## ★ ★ ★ : : कथा तिसरी

पंढरपूरची कार्तिकी यात्रा जवळ आली होती. वऱ्हाड खानदेशकडे भोळा भक्तिभाव फार. हजारों यात्रेकरू पंढरीच्या यात्रेला जातात. हजारों वारकरी निघतात.

तें एक लहान स्टेशन होतें. ते पहा शेतकरी. ते वारीला निघाले आहेत. खांद्यावर पताका आहे. हातांत टाळ आहे. कोणाजवळ वीणा आहे. धुळें--चाळीसगांव रेल्वे लाईनवरचें तें स्टेशन. जामदें त्याचें नांव. गाडीची वेळ होत आली. घंटा वाजली.

" दे रे भाऊ लौकर तिकीट. गाडी येईल. दे. "

" पैसे आहेत का ? "

" आम्ही का फुकट मागूं तिकीट ? फुकट नको कुणाचें. आम्ही शेतकरी. आम्ही जगाला पोसूं. कोणाचें फुकट नको आम्हांला. दे लौकर तिकीट. चार तिकिटें दे. "

" वीस रुपये मोजा. "

" वीस ? "

" हो वीस. "

" एका तिकीटाला ५ रुपये ? "

" हो हो हो. "

" मागें तर कमी होते. "

" आतां वाढले. तुमच्या आजोबाच्या वेळेस आगगाडी तरी होती का ? सारखें बदलतें सारें ! मोजा २० रुपये. "

" घ्या. काय करायचें ? सारीच महागाई. पोटाला कमी खाऊं पण देवाला बघून येऊं. विठ्ठलाच्या पायांवर डोयी ठेवून येऊं. द्या तिकिटें. घ्या या चार नोटा पांचा-पांचाच्या. "

चार तिकिटें घेऊन शेतकरी फलाटावर उभे होते. भगभग करित गाडी आली. गाडींत ही गर्दी. परंतु कोणी तरी त्यांना आंत घेतलें. कोण होता तो ?

" दादा, तूं होतास म्हणून ही तंबोरी फुटली नाहीं. नाहीं-तर ती खालीं पडती. वाडवडलांची ही तंबोरी " शेतकरी म्हणाला.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

" तुम्ही एखादा अभंग म्हणा. "

" म्हणूं ? तुम्हांला गोडी आहे अभंगाची. "

" मला फार आवडतात. "

त्या शेतकऱ्यानें फारच सुंदर अभंग म्हटला. रघुनाथ डोळे मिटून ऐकत होता. अभंग थांबला. त्यानें डोळे उघडले.

" तुम्ही काय करतां ? " शेतकऱ्यानें विचारलें.

" मी सेवादलाचें काम करतों. रस्ते झाडतों. लोकांना शिकवतों. भेदभाव माजवूं नका म्हणून सांगतों. "

" साधुसंतांनीं हेंच सांगितलें. "

इतक्यांत एकानें हळूच तिकिट काढलें व विचारलें:

" हें तिकिट बघा कोठलें आहे तें. "

" पंढरपूरचें. "

" ठीक. आणि काय किंमत ? "

" साडे चार रुपये. "

" साडेचार ? "

" हो. "

" आमच्याजवळून तर पांच पांच घेतले. "

" तुम्ही कसे दिलेत ? याच्यावर तर लिहिलेलें आहे. "

" मास्तर म्हणाले एकादशी आहे तिकिटें महाग आहेत. "

" एकादशीलां रताळीं महाग होतील, शेंगांचे दाणे महाग होतील. तिकिटें का महाग होतात ? "

" आम्हांला काय भाऊ माहीत ? "

" तुम्ही पंढरपूरला जाल परंतु शिकणार नाहीं. ज्ञानदेवानीं ज्ञानेश्वरी लिहिली तुमच्यासाठीं. परंतु वाचायला कोण शिकतो ? असे अडाणी राहता. सारें जग मग फसवतें, अपमान करतें. शिका. सेवादलाचे सैनिक तुम्हांला शिकवतील. पुढल्यावर्षीं पंढरीला जाल तर ज्ञानेश्वरी, गाथा, गीताई वाचीत जा. खरें ना ? "

" खरें रे भाऊ. हवं शिकायला. शेतकऱ्याचें कोणी नाहीं बघा. साऱ्या जगाचा तो पोशिंदा, परंतु त्याचा सगळीकडे अपमान. "

" आतां ज्ञान मिळवा. स्वराज्य हातीं घ्या. ज्याला ज्ञान त्याला मान. "

" मामलेदार कचेरींत ज्याच्या हातांत वर्तमानपत्र त्याला खुर्ची देतात आणि आम्हांला दूर बसवतात. "

" खरें ना ? तुम्ही वाचायला शिका. शेत नांगरणारा दुपारच्या वेळेस झाडाखालीं बसून भाकर खातांना वर्तमानपत्र वाचूं लागेल तेव्हां खरें स्वराज्य येईल. समजलें ना ? "

" होय दादा. आज चांगलेच डोळे उघडले. विठ्ठला, आतां तुझी आणभाक; शिकल्यावांचून रहायचें नाहीं. "

"छान. आतां अभंग म्हणा."

त्या शेतकरी वारकऱ्यानें पुन्हां एक सुंदर अभंग म्हटला. रघुनाथ डोळे मिटून ऐकत होता.

• • •

★ ★ ★ : : कथा चौथी

हिंदुधर्मांत ज्ञानाची फार थोरवी आहे. ज्ञानस्वरूपी परमेश्वर असें आम्ही म्हणतों. ब्रह्माची व्याख्याहि अशीच. महंमद पैगंबरहि म्हणायचे कीं "जो सृष्टीचें ज्ञान मिळवतो त्यानें शंभर वेळां नमाज म्हटला. ज्ञानासाठीं हजारों मैल जावें लागलें तरी जा." अशी ज्ञानाची महती आहे. युरोपियन स्त्रिया एकट्या जगभर जातात. त्यांना भय ना भीति. कारण त्यांना सारें माहीत असतें. परंतु हिंदी स्त्रिया एकट्या कोठें जाणार नाहींत. त्यांना कशाची माहिती नसते. वाचतां येत नाहीं. कोठें चौकशी करावी, कोठें विचारावें कळत नाहीं. सारी फजीती. तुकाराम महाराजानीं म्हटलें आहे:

"अवगुणाहातीं। आहे अवघीची फजीती॥"

समर्थ सांगतात:

"दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें
प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें।"

परंतु समर्थांची वाणी आपण ऐकली नाहीं. अज्ञानामुळें गुलाम झालों. आतां स्वराज्य आलें आहे. जर सारे सुशिक्षित होतील तरच तें टिकेल.

ती बघा एक बाई. एकटीच दिसत आहे. कोठें जायचें आहे तिला? दादर स्टेशनावर ती केव्हांची उभी आहे. पुणें, मद्रास, नागपूर सगळीकडे जाणाऱ्या गाड्या येथून जायच्या. या आजी-बाईला कोठें जायचें? एकापाठोपाठ तर गाड्या येतात.

ती पहा गाडी आली. बायकांच्या डब्यांत आजी घुसली. बाजूला गांठोडें घेऊन बसली. गाडी सुरू झाली. सुशिक्षित बायका डब्यांत होत्या. कोणी पत्ते खेळूं लागल्या. कोणी सुया काढून विणूं लागल्या. कर्जत स्टेशन आलें. दोन मुली आंत चढल्या. त्यांना बाकावर जागा मिळाली. आजीबाई खालींच बसलेली होती.

"आजी, येथें वर बसा" सरला म्हणाली.

"बरी आहें येथें मी" आजीबाई म्हणाली.

"अग त्यांना इकडे होईल विटाळ. बसूं दे त्यांना तिकडे संडासाजवळ सोंवळ्यांत" एक प्रतिष्ठित बाई म्हणाली.

"या आजी, आमच्याजवळ बसा. खालीं घाण असते" विजया म्हणाली. इतक्यांत बोगदा आला. मोठा बोगदा.

"ही गाडी कोठें जाते?" आजीबाईनें विचारलें.

" पुण्याला " सरला म्हणाली.

" पुण्याला ?"

" हो. कां ? घाबरूं नका. "

" मला जायचें येवल्याला. ही नाशिकची गाडी नव्हे का ? "

" ती हिच्या आधीं होती आजी. "

" म्हातारीला काय कळे. आतां कसें होईल माझें ? "

" घाबरूं नका. पुण्याला चला आमच्याकडे. आम्ही तुम्हांला दौंडमनमाडच्या गाडींत बसवून देऊं. सरळ येवल्याला जाल. उशीर होईल इतकेंच. "

" बरोबर कोणी नसलें म्हणजे अशी फजीती होते. "

" आजी, तुम्हांला वाचायला येत असतें तर अशी नसती फजीती झाली. गाडीवर लिहिलेलें असतें. शिवाय कोणती गाडी केव्हां येईल तें वेळापत्रकांत असतें. तुम्हांला वाचतां येत नाहीं, घड्याळ समजत नाहीं. म्हणून ही अशी फजीती. "

" खरें आहे मुलींनो. "

" आतां शिका लिहावाचायला. आम्ही सेवादलांतील मुली. आम्ही वर्ग चालवतों. त्या कर्जतला लहान मुलींबरोबर चार चार मुलांच्या आया अशा शेतकऱ्यांच्या बायाहि शिकायला येतात. गंमत होते. लहान मुली मोठ्या बायकांच्या चुका दुरुस्त करतात. "

" मी का आतां शिकूं ? "

" काय झालें न शिकायला ? ही अशी होणारी फजीती टळेल. पण आधीं इकडे वर बसा. या. आम्ही तुमच्या मुलीसारख्या. तुम्हांला बापूजींच्या गोड गोष्टी वाचून दाखवूं ? "

" बापूजींच्या ? "

" म्हणजे महात्माजींच्या. "

" का ग मुलींनो, हरिविजय आहे, रामविजय आहे, तसा महात्माविजय कोणी कां नाहीं लिहित ? मग तो खेड्यापाड्यां-तून वाचतील. त्याचा सप्ताह करतील. आम्ही आयाबाया ऐकूं. देवमाणूस होते महात्माजी. कशा गोळ्या घातल्या ग त्यांच्या-वर ? आणि त्यालाहि त्यानीं म्हणे हात जोडले ! धन्य धन्य त्यांची ! "

" आजी, आमच्या सेवादलाचे सानेगुरुजी श्रीगांधीविजय लिहिणार आहेत. अष्टोदशें म्हणजे १०८ अध्याय करणार आहेत. त्यांची श्यामची आई तुम्ही वाचली आहे का ? "

" मला नाहीं वाचतां येत. परंतु आमच्या शेजारचे एक दादा रोज रात्रीं त्यांतून वाचायचे. मी ऐकायला जात असें. डोळ्यांना पाणी येई ऐकतांना. ते का लिहिणार आहेत गांधीविजय ? छान होईल. "

" परंतु तुम्ही वाचायला शिका. "

" तुमच्या सारख्या मुली भेटल्या तर शिकेन हो."

आजी रमली. विजयानें बापूजींच्या गोड गोष्टी वाचून दाखविल्या. पुणें आलें. त्या मुलींनीं आजीबाईला घरीं नेलें. तिची सारी व्यवस्था केली. पुण्याला दौंडाकडून मनमाडकडे जाणाऱ्या गाडींत तिला बसविलें. पुण्याचे पेरू बरोबर दिले.

" मुलींनो, तुमचे उपकार."

" उपकार कसले ?"

" कोणी तुम्हांला असें वागायला शिकवलें ?"

" सेवादलानें. आजी, पण एक कबूल करा. लिहावाचायला शिका."

" शिकेन हो. तुमच्या गांधीबाप्पाची शपथ."

संगणकीकृत

• • •

★ ★ ★ : : कथा पांचवी

त्या वर्षीं प्रथम पाऊस सुंदर पडला. शेतकरी खुशींत होते. शेतें मस्त होतीं. सोळा आणे पीक येईल, लोक म्हणत. सरकारी आणेवारी झाली. परंतु शेतकऱ्याच्या हातांत प्रत्यक्ष पीक पडेल तेव्हां खरें. कधीं रोग पडेल, कधीं टोळ येतील; कधीं उंदीर खातील, तर कधीं अकालीं पाऊस कोसळेल ! शेतकऱ्याचें सारें परस्वाधीन.

आणि खरेंच मुसळधार पाऊस आला. पाऊस धोधो पडत होता. हातातोंडा आलेलें पीक मातींत मिळालें. कपाशीचें पीक गेलें. शेंगांना मोड आले. नद्यानाल्यांना पूर येऊन तीरावरच्या शेतांमध्यें रेती गाळ सांचून राहिलीं. आकाश गळत होतें आणि शेतकऱ्यांचे डोळेहि गळत होते. सारी मेहनत मातीमोल झाली.

अनेक ठिकाणीं शेतकऱ्यांच्या सभा होऊं लागल्या. खंड माफ करा, शेतसारा माफ करा, शेतकऱ्यांस तगाई द्या, असे ठराव होऊं लागले. सरकार काय करणार इकडे सर्वांचे डोळे होते.

कलेक्टराकडे शिष्टमंडळ गेलें.

“ विचार करतों ” साहेब म्हणाले. कांहीं दिवसांनीं गांवोगांवच्या चावडींत सरकारी जाहीरनामे लागलेः

“ शेतकऱ्यांनीं पिकलें किती, खर्च किती आला, तोटा किती आला, याचे जमाखर्च सादर करावे. ज्याचें नुकसान झालें आहे असें दिसेल त्याला शेतसारा माफ करण्यांत येईल. ”

शेतकऱ्यांना लिहितां वाचतां येत नाहीं. तो कसा जमाखर्च ठेवणार ? जे शिकलेले जमीनदार होते त्यांच्याजवळ जमाखर्च होते. त्यांना भराभरा सूट मिळत गेली. आणि गरीब शेतकरी, त्यांचीच दाद लागेना.

त्या दिवशीं गोविंदा त्या गांवाला गेला होता. गोविंदा मोठा सेवेकरी. त्याची मूक सेवा होती.

" दादा, आमचा शेतसारा नाहीं का कमी व्हायचा? सारा भुईमूग गेला."

" सरकार जमाखर्च दाखवा म्हणतें."

" आमचा उघडा हिशेब. सारा तोंडीं सांगूं. म्हणावें आमचीं घरें बघा. गाडगीं मडकीं रिकामीं आहेत. तीं सांगतील कीं या घरांत यंदा दाणे नाहींत."

" साहेबाला पांढऱ्यावरचें काळें समजतें. त्याला हिशोब हवा. काय करायचें? तुम्हांला सारी दुनिया नाडते. तरी तुम्ही चार अक्षरें शिकणार नाहीं. शिका म्हटलें तर म्हणाल " आम्हांला का मामलेदार मुन्सफ व्हायचें आहे. अरे, माणसासारखें या जगांत वागायचें असेल तर शिकलें पाहिजे. पदोपदीं अडतें. पत्र लिहितां येत नाहीं, आलेलें वाचतां येत नाहीं. पत्र लिहिणाराला द्या पैसा. मनी ऑर्डर लिहिणाराला द्या पैसा. आधींच गरीबी, त्यांत ही अशी दक्षिणा वाटायची. कधीं तुमचे डोळे उघडायचे? शिका. उद्यां स्वराज्य आलें तर तें कसें टिकायचें याची मला चिंता वाटते."

" येणार का भाऊ स्वराज्य?"

" येणार. इंग्रज जाणार."

" गांधी बाप्पाची पुण्याई."

" परंतु गांधीबाप्पांची पुण्याई कोठवर पुरणार? आपण

District Information ... No.

चांगले होऊं या. शिकूं या. उद्योगी होऊं या. प्रेमानें राहूं या. स्वच्छता ठेवूं या."

"होय दादा. उद्यांपासून मी हातांत पाटी घेतों. आम्ही अडाणी म्हणून तर जगाचे पोशिंदे असून उपाशी मरतों."

"बरोबर बोललास. शिका. खरें स्वराज्य आणा."

● ● ●

## ★ ★ ★ : : कथा सहावी

मंदी मोठी गोड मुलगी. सर्वांना ती हवी हवीशी वाटे. खेळकर आणि आनंदी. चपळ आणि उत्साही. खोड्या करील, उपयोगीहि पडेल.

"मंदे, तुझे डोळे मला दे" कुसुम म्हणायची.

"आणि तुझें नाक मला दे" मंदी हंसत तिला म्हणायची.

मंदी शाळेंत जाई. अजून लहान होती. तिचे वडील देवाघरीं गेले होते. आईची एकुलती मुलगी. आणि घरची गरिबी. चार ठिकाणीं चार धंदे मंदीची आई करी. कसाबसा निर्वाह करी.

एके दिवशीं कांटेरी तारेवरून मंदी उडी मारीत होती. परंतु तार पायांना जोरानें लागली. गंजून गेलेल्या तारा. त्या विषारी असतात. मंदीचा पाय बरा होईना. शेवटीं आईनें

तिला डॉक्टराकडे नेलें. डॉक्टरांनीं औषधोपचार केले. थोडे दिवस गेले नि पाय सुकत चालला.

" हें बघा, आतां रोज यायला नको. हें आयोडीन देतों. तें दिवसांतून दोन तीन वेळां लावीत जा " डॉक्टर म्हणाले.

" डॉक्टर, किती पैसे झाले ? "

" पैसे नको. असल्या हंसऱ्या मुलीचे का पैसे घ्यायचे ? मंदे. आतां रडूं नको. पाय बरा होईल. "

मंदीला घेऊन ती माता घरीं गेलीं. परंतु दोनचार दिवस गेले नि मंदीच्या डोळ्यांना धार लागली. ते सुंदर टपोरे डोळे, काळेभोर निर्मळ डोळे ! काय झालें ? कोणाची दृष्ट का पडली ? स्था.वा २५३४/६४०५८/३२/०-४०/-

आईनें डॉक्टरांना जाऊन सांगितलें. त्यानीं डोळ्यांत घालायला औषध दिलें. परंतु एके दिवशीं काय झालें आई होती घाईत. डोळा तर दुखत होता.

" मंदे, औषध डोळ्यांत घालून मी जातें. तूं पडून रहा मग. होतील बरे दोन दिशीं. रडूं नकोस " आई म्हणाली. तिनें पटकन् बाटली आणली. मंदी निजली होती. आईनें डोळ्यांत बाटलींतलें औषध घातलें. तों डोळ्यांचा भडका उडाला. साक्षरतेच्या कथा — साने गुरुजी

" आई, डोळे जळले ग, भाजले. अयाई, आग, आग. आई,

तूं आयोडीन घातलेंस डोळ्यांत!" मंदी रडत ओरडत म्हणाली.

आई घाबरली. ती धांवत धांवत डॉक्टरांकडे गेली.

"काय हो, काय झालें?" डॉक्टरानीं विचारलें.

"डॉक्टर लौकर चला. पोरीच्या डोळ्यांत आयोडीन पडलें. भाजले डोळे. चला."

"असें कसें केलेंत? बाटल्यांवर लिहून ठेवलेलें होतें:–हें डोळ्यांचें औषध, हें आयोडीन–तुम्ही बघायला नको?"

"डॉक्टर, आईबापानीं लिहावाचायला शिकविलें नाहीं. काय करायचें? अशी अडाणी राहिलें. चला आधीं."

"तुमच्या घरांत साबुदाणा आहे?"

"आणीन नसला तर."

"त्याची पातळ लापशी करा. चमचा चमचा डोळ्यांत घालायची, पुन्हां काढायची. डोळे त्या लापशीनें धूत रहायचें. शेवटीं निर्मळ लापशी डोळ्यांतून बाहेर येईपर्यंत असें करायचें. जा. मी येतोंच." आई लगबगीनें घरीं गेली. थोड्या वेळानें डॉक्टरहि तेथें गेले. लापशी तयार झाली. ते डोळ्यांत घालीत होते. डोळ्याला बरें वाटलें.

"मंदे, बरें वाटतें का?"

"होय डॉक्टर. नीट होईल ना डोळा?"

" होईल हो. घाबरूं नको. आणि डोळे बरे झाले म्हणजे आईला आधीं लिहावाचायला शिकव. तूं शाळेंत जातेस. परंतु तुझ्या आईला कोण शिकवणार ? आईला लिहितां वाचतां येत असतें तर तुझे डोळे जायची आज पाळी आली नसती. खरें ना ? "

" आई शिकेल का डॉक्टर ? "

" तुझ्या डोळ्यांची गोष्ट त्यांच्यासमोर आहे. शिकतील. शिकाल ना मंदाच्या आई ? "

" मंदानें शिकवलें तर शिकेन. "

" मी आईची मास्तरीण ! "

" परंतु आईला छडी नको हो मारूं " डॉक्टर हंसून म्हणाले.

• • •

## ★ ★ ★ : : कथा सातवी

राधीची मुलगी आजारी होती. सासरहून कागद आला होता. राधीचें मुलीवर फार प्रेम. पोरीला पाहून यावें असें तिच्या मनांत आलें.

" येऊं का जाऊन ? दोन दिवशीं परत येईन. तोंवर सांभाळा घर " ती नवऱ्याला म्हणाली.

" तूं एकटी जाशील ? स्टेशनावर उतरून पुढें बरेंच जावें लागतें. रस्ता चुकायचीस. "

" तोंड आहेना. कोणाला विचारीन. आणि देव का रस्ता दाखवणार नाहीं ? तो का पोरासाठीं तडफडणाऱ्या आईला चुकवील ? मी जाऊन येतें. "

" जा. मला तर सवड नाहीं. घेतलेले पैसे खंडायचे आहेत. कामावर जायला हवें. "

राधीनें गांठोडें बांधलें. नातवंडांना थोडा खाऊ घेतला. निघाली. पाय हेंच गरिबाचें वाहन. ती माउली डोयीवर गांठोडें घेऊन निघाली. आली स्टेशनवर.

" कोठलं तिकिट हवं ? " स्टेशनमास्तरानें विचारलें.

" पोरीच्या गांवचें. आजारी आहे भाऊ ती. दे लक्कन. "

" अग गांवाचें नांव काय? "

" गांव त्या स्टेशनापासून दूर आहे. "

" स्टेशनाचें नांव काय ? "

" मला लांबकान्याला जायचें ? "

" मग शिंदखेडचें देऊं तिकिट, का दोंडाईच्याचें देऊं ? "

" कोणतंबी द्या. "

तिकिट घेऊन फलाटावर राधी आली. भगभग करीत

गाडी आली. आज नरढाण्याचा बाजार होता. गाडींत गर्दी. राधी कशीबशी आंत घुसली.

" तिकडे दूर हो " कोणी म्हणाले.

" पोरीकडे चाललें रे भाऊ. ती आजारी आहे. बसूं नको माझ्या गांसोड्यावर. आंत पापड आहेत. मोडतील."

" डोकीवर घे तुझें गासोडें."

राधी गांठोडें डोक्यावर घेऊन उभी राहिली. आणि शिंदखेडें स्टेशन आलें.

" लांबकान्याला जायचें. येथेंच उतरूं का रे भाऊ ?"

" नरढाण्याला कां नाहीं उतरलीस ? उतर, इथें उतरलीस तरी चालेल."

राधी उतरली. पडली स्टेशनाबाहेर. रस्ता विचारून निघाली. तिसरा प्रहर टळला होता. झपझप ती जात होती. तों पुढें दोन रस्ते आले. तेथें एक खांब होता. रस्ते कोठें जातात तें त्याला लावलेल्या पाटीवर लिहिलेलें होतें. परंतु राधीला का वाचतां येत होतें ? आजुबाजूला कोणी माणूस दिसेना. ती निघाली एक रस्ता घेऊन. देव मावळला. कोठें आहे गांव ? गुराखी जात होते. गायी घरीं जात होत्या.

" का रे पोरांनो, लांबकानें गांव इकडेच आहे ना ?"

" इकडे तर दलवाडें. लांबकानें तिकडे राहिलें. ते रस्ते फुटले ना. तेथला दुसरा रस्ता. "

" अग बया ! आतां कसें करूं ? " असें म्हणून ती मटकन् खालीं बसली. आतां रात्र होणार, अंधार.

" आमच्या गांवांत चला " गुराखी म्हणाला.

" कोणी ओळखीचें नाहीं रे. "

" तो गणप्या आहे. तो तुमची करील व्यवस्था. "

" तो का गांधीचा मनुष्य आहे ? "

" हो. तो सेवादल चालवतो. सर्वांच्या उपयोगी पडतो. मागें तें वादळ झालें ना ? छपरें उडालीं. झाडें पडलीं. गणप्या व त्याचे मित्र यांनीं किती काम केलें. गरिबांच्या झोंपड्या त्यांनीं पुन्हां शाकारून दिल्या. चला, उठा. "

राधी गांवांत आली. गणप्या भेटला.

" मी आतां गाडी जुंपतों. पांखरासारखे बैल आहेत. तुम्हांला पोंचवतों आई. थोडी भाकर खाऊन घ्या. चालून दमला असाल. तुम्ही भाकर खा तोंवर मी गाडी जोडतों " गणप्या म्हणाला.

राधीनें भाकर खाल्ली. आणि गणप्यानें गाडी जुंपली. बैल निघाले हरणासारखे.

" तुम्हांला वाचतां येत असतें तर अशी फजीती नसती झाली " गणप्या म्हणाला.

" खरें तुझें म्हणणें. त्या खांबावर पाटी होती. परंतु आमचे डोळे असून फुकट. केवढा हिसका पडला. तूं देवमाणूस भेटलास म्हणून बरें. नाहींतर रातची कोठें गेलें असतें भाऊ ? "

" सर्वांनीं लिहावाचायला शिकलें पाहिजे. त्याचा फार उपयोग असतो. "

" आम्हां बायांना कोण शिकवणार ? "

" सेवादलांतील मुलें मुली शिकवतील. तुमच्या गांवीं नाहीं का सेवादल ? कोणतें तुमचें गांव ? "

" टाकरखेडें. "

" अमळनेरच्या मुलांना मी लिहीन. ते तुमच्या गांवांत सेवादल काढतील. रात्रीं शिकवतील. सकाळीं सफाई करतील. "

" तुम्हांला असें करायला कोण सांगतो ? "

" गांधीबाप्पा. "

" ते तर गेले ना रे भाऊ ? सारें जग हळहळलें. "

" ते गेले तरी त्यांची शिकवण आहे. तें बघा लांबकानें आलें. ते दिवे दिसताहेत. "

आणि गांव आला. गणप्यानें राधीला तिच्या मुलीच्या घरीं थेट नेलें. गाडी कोणाची म्हणून मुलगी बाहेर आली. तों तिचीच माय समोर उभी.

" मायवो, कोठून आलीस ? "

" तुला बघायला; भेटायला आलें. रस्ता चुकलें. या दादानें गाडी जोडून आणलें. देवमाणूस. तूं बरी आहेस ? "

" आतां बरें वाटतें. "

गणप्यानें तेथें भाकर खाल्ली. तेथील मुलें त्याच्या ओळखीचीं होतीं. तेथें सेवादल होतें. तेथेंहि साक्षरतेचा वर्ग चालू होता. तो त्या वर्गाला गेला. आणि त्यानें राधीची गोष्ट सांगितली. शेवटीं म्हणाला " ज्ञान हा खरा दिवा. ज्ञान हा खरा प्रकाश. हातांत कंदील आहे परंतु पाटी वाचतां येत नाहीं तर रस्ता चुकायचा. भलतीकडे माणूस जायचा. ज्ञान सर्वांना डोळस करतें. म्हणून शिका नि सर्वांना शिकवा. भारतांत आतां कुणाला अडाणी नका ठेवूं. "

• •